पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३४ /२०१४
दिनांक : १०/०१/२०१४

प्रति,

मा.......................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची सभा दिनांक **१७/०१/२०१४** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१७/०१/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.

## मा.विधी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक - १६**

दिनांक : **१७/०१/२०१४** वेळ : दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १७/०१/२०१४ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक २३/१२/२०१३ व ०३/०१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१४)** सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक ०३/०१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१५)** सभावृत्तांत कायम करणे.

----------

**विषय क्र.१)** श्री. सतिश कुलकर्णी, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/०७/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक १७/०१/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** श्री. ज्ञानेश्वर ढेरे, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २३/०९/२०१३ पासून पुढे१ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक १७/०१/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.३)** श्री.गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक १७/०१/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.४)** श्री.प्रमोद भोसले, मुख्यलेखापाल यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नुसार मुख्यलेखापाल पदावरील नियुक्तीसंदर्भात मे.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन स्टॅम्प क्र. २३३१७/२०१२ पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ विरुध्द महाराष्ट्र शासन व पिं.चिं.मनपा या दाव्यामध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधीन राहून २३/०७/२०१३ पासून पुढे ०१ वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक १७/०१/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.५)** जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर खाली नमुद केलेप्रमाणे -

| अ. क्र. | नांव | पदोन्नतीचे पदनाम | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | डॉ.पाटणेकर राजीव विष्णूपंत | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |
| २ | डॉ.पोटे संजय लक्ष्मण | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला(इ.मा.व) |
| ३ | डॉ.जॉन सुनिल | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |

अधिका-यांना पे बँड र.रु. १५६०० - ३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये जेष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता मिळण्यासाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक १७/०१/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.६)** श्री.खांडकेकर प्रशांत शरद, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक १७/०१/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.७)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ मधील प्रस्तावात नमुद प्रमाणे परिशिष्ट १ ते ६ मधील सेवा भरती करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती, अधिकारी व कर्मचारी यांच्या पदासाठीची शैक्षणिक अर्हता, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विभागीय परीक्षा नियम, पदोन्नतीसाठी एकत्रित संवर्ग, विविध पदांची पदोन्नती साखळी, अनुसरावयाचे महत्वाचे शासन निर्णयाची यादी यांस महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) (अ) व (ब) अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक १७/०१/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.८)** महानगरपालिकेतील कामकाजासाठी काही नवीन विभाग सुरु करणे त्यासाठी आवश्यक असणा-या गट अ ते ड मधील काही संवर्गाच्या पदसंख्येत वाढ करणे, आवश्यक तेथे नवीन पदांची निर्मिती करणे आवश्यक असल्याने काही संवर्गाच्या पदसंख्येत वाढ सुचविली आहे. तर काही नवीन पदांची निर्मिती करुन त्यांची शैक्षणिक अर्हता, पदोन्नती सोपान, वेतनश्रेणी व पदसंख्या प्रस्तावित करण्यात आलेली आहे. यामुळे महापालिका आस्थापना खर्चात वार्षिक ८९.८९ कोटीने वाढ होणार आहे. सन २०१२-१३ या वर्षाचा आस्थापना खर्चाची आऊटसोर्सिंगच्या खर्चासह टक्केवारी २३.६१ टक्के आहे. सन २०१३-१४ मधील महसुली उत्पन्न १९२६ कोटी असून आस्थापना खर्च ५०७.६२ कोटी इतका अपेक्षित आहे. आस्थापना खर्चाची टक्केवारी २७.०७ टक्के आहे. नवीन पदांची निर्मिती व पदसंखेत वाढ केल्याने ८९.८९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एकूण आस्थापना खर्च ५९७.५१ कोटी इतका होईल. हा आस्थापना खर्च सन २०१३-१४ च्या महसूली उत्पन्नाच्या ३१ टक्के इतका होईल. प्रस्तावात नमुद प्रपत्र 'ब ' मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यकता नसणारी अथवा आऊटसोर्सिंगद्वारे कामकाज करुन घेता येऊ शकणारी काही अनावश्यक पदे व्यपगत/निरस्त करणे आवश्यक आहे. प्रस्तावात नमुद प्रपत्र 'ब' नुसार सदर पदे निरस्त करण्यास तसेच प्रपत्र 'अ' नुसार आवश्यक पदांच्या संख्येत वाढ करण्यास व नवीन पदांच्या

निर्मितीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ (४) अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक १७/०१/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.९)** जैवविविधता कायद्यान्वये "जैवविविधता" समिती स्थापन करणेसाठी मनपाचे विद्यमान नगरसेवकांमधून ६ सदस्य व १ मनपा प्रशासकीय अधिकारी असे एकूण ७ सदस्यांची समिती स्थापन करावयाची आवश्यकता आहे. सदर ६ नगरसदस्यांपैकी २ जागा महिलांसाठी व २ जागा एस.सी./एस.टी. साठी आरक्षित असून मनपाच्या कायम अस्थापनेवरील १ सदस्य नेमणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत पिं.चिं.म.न.पा. मध्ये वृक्ष प्राधिकरण समिती कार्यान्वित आहे व त्या समितीमध्ये मा.मुख्य उद्यान अधिक्षक हे सदस्य आहेत. जैवविविधता समितीमध्ये मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांची महात्वाची भूमिका असल्याने म.न.पा.तर्फे मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांचा समितीमध्ये समावेश करणे गरजेचे आहे. ही ७ सदस्यांची समिती स्थापन झाल्यानंतर शहरातील विविध विषयांतील ७ तज्ञ सदस्यांची (उदा.वनस्पती तज्ञ, पक्षी तज्ञ, प्राणी तज्ञ, जलचर तज्ञ, शेती तज्ञ, माती तज्ञ, जैवविविधता तज्ञ इ.) निवड करणे आवश्यक आहे. तदनंतर एकूण १४ सदस्यांची "जैवविविधता" व्यवस्थापन समिती स्थापन करणे शक्य होईल. यामध्ये शहरातील आमदार व खासदार विशेष निमंत्रित असतील. ही समिती पाच वर्षे कालावधीकरीता असते व निवडणूकीनंतर नविन ६ नगरसदस्यांची व १ मनपाचा अधिकारी (मुख्य उद्यान अधिक्षक) यांची समिती स्थापन करण्याची तरतूद असल्याने म.न.पा. क्षेत्रासाठी विद्यमान सदस्यांपैकी ६ सदस्य व १ मनपा प्रशासकीय अधिकारी (मुख्य उद्यान अधिक्षक यांची) जैवविविधता समिती व त्यामध्ये शहरातील विविध विषयांतील ७ तज्ञ सदस्यांची निमंत्रीत तसेच शहरातील ३ आमदार व २ खासदारांची विशेष निमंत्रीत म्हणून निवड करुन पिंपरी चिंचवड शहरासाठी जैवविविधता व्यवस्थापन समिती गठीत करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१०)** सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह परवाना फी दर निश्चितीबाबत व महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दरातील तफावत विचारात घेऊन परवाना फी मध्ये प्रस्तावासोबतचे परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेप्रमाणे दरवाढ प्रस्तावित करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३४/२०१३
दिनांक : ०९/०१/२०१३

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.